आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२४ ऑगस्ट २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या जळगावमध्ये लाखो लखपती दीदींशी संवाद साधणार, बचत गटांच्या कर्ज वितरणालाही करणार सुरुवात

- शेवटच्या महिलेचा अर्ज येईपर्यंत लाडकी बहीण योजनेसाठी नोंदणी सुरू राहणार असल्याची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही, महिलांच्या सुरक्षेसाठी कटीबद्ध असल्याचाही पुनरुच्चार

- कायदा सुव्यवस्थेच्या प्रश्नावरुन राज्य सरकारच्या राजीनाम्याची आणि राष्ट्रपती राजवट लागू करण्याची विरोधकांची मागणी, महिलांवरच्या अत्याचाराच्या मुद्द्यावरुन राजकारण न करण्याचं भाजपाचं आवाहन

- परभणीतल्या २ लाख सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना पीक वीम्याचे पैसे आठवडाभरात देण्याचे केंद्र सरकारचे वीमा कंपनीला आदेश

**आणि**

- नेपाळमध्ये अपघातात मृत झालेल्यांचे पार्थिव संध्याकाळी जळगावमध्ये पोहोचणार, केंद्र सरकारकडून कुटुंबियांना आर्थिक मदत जाहीर

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या जळगावमध्ये लखपती दिदी संमेलनात सहभागी होणार आहेत. देशभरातल्या 11 लाख नव्या लखपती दीदींना प्रमाणपत्र देऊन प्रधानमंत्री त्यांचा गौरव करणार आहेत. तसंच अडीच हजार कोटी रुपयांच्या फिरत्या निधीच्या वितरणाची सुरुवात प्रधानमंत्री करणार आहेत. देशभरातल्या सव्वा चार लाखांहून अधिक बचत गटातल्या सुमारे ४८ लाख महिलांना याचा लाभ होणार आहे. यावेळी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते पाच हजार कोटी रुपयांच्या बँक कर्जाचं

वाटप होईल. याचा लाभ २ लाख ३५ हजार बचत गटातल्या २५ लाखांहून अधिक सदस्यांना होईल.

देशातल्या सर्वाधिक १६ लाख लखपती दीदी महाराष्ट्रात आहेत. या कार्यक्रमात जवळपास दीड लाख लखपती दीदी सहभागी होणार असल्याची माहिती मंत्री गिरीष महाजन यांनी आज जळगावमध्ये दिली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी त्यांच्याशी चर्चा करतील, या महिला लखपती कशा झाल्या, त्यांना काही समस्या आहेत का हे प्रधानमंत्री त्यांच्याकडून जाणून घेतील.

त्यानंतर संध्याकाळी राजस्थानात जोधपुर मध्ये राजस्थान उच्च न्यायालयाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त होणार असलेल्या समारंभाला प्रधानमंत्री संबोधित करणार आहेत.

**<><><><><>**

आकाशवाणीच्या मन की बात या कार्यक्रमाद्वारे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी अकरा वाजता देशवासियांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा ११३ वा भाग आहे.

हा कार्यक्रम आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून आणि दूरदर्शन वाहिनीवरून प्रसारित होईल. newsonair.gov.in हे संकेतस्थळ तसंच न्यूज ऑन एअर या मोबाईल ॲपवरही हा कार्यक्रम प्रसारित केला जाईल. आकाशवाणी आणि दूरदर्शनचे यूट्यूब चॅनल, प्रधानमंत्री कार्यालय आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या यूट्यूब चॅनलवर या कार्यक्रमाचं थेट प्रसारण केलं जाणार आहे. रात्री ८ वाजता या कार्यक्रमाचं मराठी भाषांतर ऐकता येईल.

**<><><><><>**

राज्यातल्या शेवटच्या बहिणीचा **अर्ज** सादर होईपर्यंत योजनेसाठी नोंदणी सुरूच राहील, असं आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलं आहे. यवतमाळ इथं लाडकी बहीण योजनेच्या वचनपूर्ती मेळाव्यात ते बोलत होते. या योजनेसाठी

आतापर्यंत एक कोटी ४० लाख महिलांनी नोंदणी केली असून एक कोटी सात लाख लाभार्थ्यांच्या खात्यात योजनेची रक्कम जमा झाल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. पुढच्या महिन्यात अर्ज सादर करणाऱ्यांनाही ३ महिन्याचे पैसे देणार असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. तर या योजनेमुळे चांद्यापासून बांद्यापर्यंत महिला समाधानी असून निकषात बसणारी एकही महिला यापासून वंचित राहणार नाही, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी म्हणाले.

महिलांच्या सुरक्षेसाठी सरकार कटीबद्ध असल्याचा पुनरुच्चार त्यांनी यावेळी केला.

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी मुंबईत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षच मोठा भाऊ असेल, अशी ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी दिली आहे. मुंबईत महाविकास आघाडीची बैठक संपल्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. बदलापूरसह संपूर्ण राज्यातून समोर येणाऱ्या बलात्कार किंवा लैंगिक अत्याचाराच्या घटनांचे महाराष्ट्रावर काय परिणाम होतील, या अनुषंगानं या बैठकीत चर्चा झाल्याची माहिती त्यांनी दिली. विधानसभा निवडणुकीच्या जागावाटपाचा निर्णय जेव्हा होईल, तेव्हा लगेचच तो जाहीर करू, असंही आव्हाड यांनी सांगितलं.

**<><><><><>**

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणी सरकारचा निषेध करण्यासाठी आज महाविकास आघाडीच्या घटकपक्षांतर्फे राज्यात विविध ठिकाणी आंदोलन करण्यात आलं. या मुद्द्यावर पुकारलेला बंद बेकायदेशीर असल्याचा निर्वाळा उच्च न्यायालयाने दिल्यानंतर आज केवळ निदर्शनं करण्याचा निर्णय मविआनं घेतला.

ठाण्यात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आलं. या घटनांना मुख्यमंत्री आणि गृहमंत्री जबाबदार असल्यानं त्यांनी

राजीनामा द्यावा अशी मागणी त्यांनी केली. राज्यात कायदा आणि सुव्यवस्था ढासळल्यानं महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू करावी, अशी मागणी काँग्रेसचे विधिमंडळ गटनेेते बाळासाहेब थोरात यांनी अहमदनगर जिल्ह्यातल्या संगमनेरमध्ये आंदोलनादरम्यान केली. सत्ताधाऱ्यांनी आरोपीला पाठीशी घालण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मुंबईत केला.

पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं आंदोलन केलं. पक्षाचे अध्यक्ष शरद पवार आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी यावेळी सरकारवर टीका केली.

<><><><><>

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर भाजपानं आज राज्यात जागर जाणिवेचा हे अभियान राबवलं. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी अमरावतीत इथं झालेल्या आंदोलनात अत्याचाराच्या घटनेचा निषेध केला. या प्रकरणातल्या आरोपींना लवकरात लवकर शिक्षा व्हावी, यात कुणीही राजकारण करू नये असं बावनकुळे म्हणाले. इतर ठिकाणी झालेल्या आंदोलनात पक्षाचे विविध नेते, पदाधिकारी उपस्थित होते.

<><><><><>

परभणी जिल्ह्यातल्या जवळपास दोन लाख शेतकऱ्यांचे सोयाबीन पिकाच्या पिकविमा दाव्याचे प्रलंबित असलेले दोनशे ते सव्वा दोनशे कोटी रुपये मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. केंद्रीय तांत्रिक सल्लागार समितीने संबंधित पीक विमा कंपनीला प्रलंबित रक्कम एका आठवड्यात शेतकऱ्यांना देण्याचे आदेश आज दिले.

केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान २१ ऑगस्ट रोजी नांदेड दौऱ्यावर परभणीतल्या शेतकऱ्यांनी पिकविम्याची समस्या ऐकून घेतली होती. त्यानंतर दुसऱ्या दिवशी या संदर्भात कृषी आणि शेतकरी कल्याण विभागाने केंद्रीय तांत्रिक सल्लागार समितीची बैठक घेतली. या बैठकीत पीक विमा कंपनीने पीक

कापणी संबंधी घेतलेले आक्षेप समितीने फेटाळून लावत प्रलंबित पैसे आठवडाभरात अदा करण्याचे आदेश दिले.

**<><><><><>**

नेपाळमध्ये झालेल्या अपघातात मरण पावलेल्यांच्या कुटुंबांना दोन लाख रुपये, तर जखमींना ५० हजार रुपयांची मदत देण्याची घोषणा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली आहे. या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये महाराष्ट्रातल्या २५ जणांचा समावेश असून त्यांचे मृतदेह भारतीय हवाई दलाच्या विमानाने भारतात आणण्यात येणार आहेत. हे विमान संध्याकाळी सात वाजेपर्यंत जळगाव इथल्या विमानतळावर पोहोचेल अशी माहिती केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी दिली.

**<><><><><>**

जालना इथं गजकेसरी स्टील कंपनीत झालेल्या स्फोटातल्या तीन गंभीर जखमी कामगारांना छत्रपती संभाजीनगर इथं हलवलं आहे. या अपघातात एकूण २२ कामगार जखमी झाले असून इतरांवर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

**<><><><><>**

पुणे जिल्ह्यातल्या पौडजवळ हेलिकॉप्टर कोसळून झालेल्या अपघातात हेलिकॉप्टर चालकासह तीन जण जखमी झाले आहेत. **अपघातग्रस्त हेलिकॉप्टर**

**<><><><><>**

राज्यातल्या बहुतांश भागात आज पावसानं हजेरी लावली.

**सिंधुदुर्ग जिल्ह्यात** कुडाळ तालुक्यात माणगाव खोऱ्यात पूल पाण्याखाली गेले आहेत. त्यामुळे एसटी बस अडकून पडल्या आहेत. दरम्यान कर्ली आणि तेरेखोल नदी इशारा पातळी जवळून वाहत होत्या.

**जालना शहरासह** घनसावंगी तालुक्यातल्या मुरमा, कंडारी, आंतरवाली टेंभी, रामसगाव, शेवता, बानेगाव या भागात झालेल्या जोरदार पावसामुळे कपाशी, सोयाबीन, ऊस या पिकांमध्ये पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात साचले आहे.

**धुळ्यात** निम्न पांझरा प्रकल्पातून पाणी सोडण्यात आल्याने पांझरा नदीपात्रासह इतर नदीनाल्यांना पूर आला आहे. त्यामुळं नदी काठच्या नागरिकांना खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**बीड जिल्ह्यातल्या** पाटोदा इथं आवड्याभरात दुस-यांदा भरपूर पाऊस झाल्यानं मांजरा नदीसह अनेक नद्या दुथडीभरून वाहात आहेत.

**नाशिक** जिल्ह्यात सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे गंगापूर धरणातून विसर्ग सुरू आहे.

**बुलडाणा जिल्ह्यात** जलाशये पूर्णपणे भरली आहेत.

**<><><><><>**

येत्या २४ तासांत **रायगड**, **पुणे आणि सातारा** जिल्ह्यांत अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे. या जिल्ह्यांना उद्या रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर **पालघर, ठाणे, रत्नागिरी, जळगाव आणि नाशिक** या जिल्ह्यांत ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. विदर्भातल्या सर्व जिल्ह्यांसह **कोल्हापूर, जालना, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, धुळे आणि सिंधुदुर्ग** या जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. उर्वरीत महाराष्ट्रात तुरळक पावसाची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली आहे.

**//<><><><><>//**